नि.दि.दा. क्र.२७/२०२४
अखिलेश – वि.– वेस्टर्न
कोलफिल्ड लि.
नि.क्र.१४

**वादीचा अधिकचा सरतपास श्री. एम.डी.चिखले वकील साहेब मार्फत शपथेवर सुरुः**

**१.** मी माझ्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.१४ वर दाखल केला आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीला असुन तो खरा व बरोबर आहे. मी अभिलेखावर माझ्या आधार कार्डची पडताळणी केलेली प्रत दाखल केली आहे. मूळ प्रत सोबत आणली आहे. त्यास **नि.क्र.१७** देण्यात येते. अभिलेखावर माझा शाळा सोडल्याचा दाखला पडताळणी केलेली प्रत दाखल केली आहे. मूळ प्रत सोबत आणली आहे. त्यास **नि.क्र.१८** देण्यात येते. माझा माध्यमिक शाळेचे प्रमाणपत्रची पडताळणी केलेली प्रत दाखल केली आहे. मूळ प्रत सोबत आणली आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात येते. माझा अधिवास प्रमाणपत्रची पडताळणी केलेली प्रत दाखल केली आहे. मूळ प्रत सोबत आणली आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येते. माझी शिधापत्रिका पडताळणी केलेली प्रत दाखल केली आहे. मूळ प्रत सोबत आणली आहे. त्यास **नि.क्र.२१** देण्यात येते. ७/१२ उताऱ्याची सत्यप्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.२२** देण्यात येते. प्रतिवादीसोबत केलेल्या करारनाम्याची प्रत अभिलेखावर दाखल आहे. त्यास **आर्टिकल अ** देण्यात येते. कब्जापत्राची झेरॉक्स प्रत अभिलेखावर दाखल आहे. त्यास **आर्टिकल ब** देण्यात येते. क्षेत्रीय योजना अधिकारी, नागपूर क्षेत्र यांचे पत्राची झेरॉक्स प्रत अभिलेखावर दाखल आहे. त्यास **आर्टिकल क** देण्यात येते. माझ्या जन्माचा दाखल अभिलेखावर दाखल आहे. त्यास **नि. क्र. २३** देण्यात येते. माझे नावात बदल केल्याबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र सत्यप्रत दाखल आहे. त्यास **नि.क्र.२४** देण्यात येते. मूळ खरेदी खत दस्त क्र. १४१४/२००४ दाखल केली आहे. त्यावर लिहून घेणारी म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२५** देण्यात येते. प्रतिवादीतर्फे मला मिळालेल्या मोबदल्याची रक्कम माझ्या बॅंक खात्यात जमा झाली हे दाखविण्याकरिता मी बॅंक ऑफ बडोदा येथील

माझे खात्याची पासबुक अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.२६** देण्यात येते. मोबदला मिळाल्याची दि. ३०/१२/२०२२ अशी नोंद पासबुकमध्ये आहे.

सरतपास पूर्ण

**प्रतिवादीतर्फे उलटतपास श्री. एस.एस.कुशवाह वकील साहेब यांच्यामार्फत शपथेवर सुरु**

२. मी वर्ग दहा पास आहे. मी प्रतिवादीसोबत अखिलेश कोमल यादव या नावाने करारनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझी जमिनीचे खरेदीखत नि.क्र.२५ अखिलेश कोमल यादव या नावाने होते. माझ्या वडिलांनी त्याच्या नावात फरक असल्याबाबत कोणतेही महाराष्ट्र शासन राजपत्रात जाहीर करुन घेतले नाही. मी व माझ्या वडिलांनी आमचे आडनाव Yadav ऐवजी Yadao असे असल्याबाबत महाराष्ट्र शासन राजपत्रात जाहीर करुन घेतले नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. १८ मध्ये माझे आडनाव Yadao असे नमून आहे. हे म्हणणे खर आहे की, दोन्ही आडनाव स्पेलींगमध्ये फरक आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. १८ वरील माझ्या आडवाच्या स्पेलींमध्ये दुरुस्ती केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. १८, १९ व २० यावर माझ्या वडिलांचे नाव कोमलसिंग असे लिहीले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी अखिलेशकुमार कोमल यादव या नावाने नौकरी मिळण्याकरिता प्रतिवादीकडे अर्ज केला होता. परंतु, सदर अर्ज ग्राह्य धरण्यात आला नाही. अखिलेश कोमल यादव, अखिलेशकुमार कोमल यादव, अखिलेश कोमलसिंग यादव हे तिनही व्यक्ती एकच व्यक्ती आहे याबाबत दस्त माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, वरील तिनही नाव एकाच व्यक्तीचे आहे याबाबत महाराष्ट्र शासन राजपत्रात जाहीर करुन घेतले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष दिली.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.12.12 11:08:22 +0530

**(जी.ओ. वानखडे)**
दि.न्या. क. स्तर, पारशिवनी

समक्ष

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.12.12 11:08:27 +0530

**(जी.ओ. वानखडे)**
दि.न्या. क. स्तर, पारशिवनी

दिनांकः ११/१२/२०२५